**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सुनिल शिवाजी हारदे,

वय – ३२ वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – बहिरवाडी, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम. के. सोनवणे यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक १९.०३.२०२३ रोजी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावून पंचनाम्यावर सही करण्यास सांगितले. अपघात झालयाबाबत तो पंचनामा होता. परंतु, मी तयोतील मजकूर वाचला नव्हता. केवळ त्यावर सही केली होती. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीस **निशाणी १०** देण्यात येते.

साक्षीदार अभियोग पक्षास सहाकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली**.** वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १९.०३.२०२३ रोजी नेवासा पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉ. गिते यांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी नेवासा खु. येथील नाथबाबा चौक येथे बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे नेवासा ते श्रीरामपूर जाणारा दक्षिणोत्तर डांबरी रस्ता दिसत होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आजूबाजूला दुकाने, टप–या दिसत होत्या, पश्चिमेला प्रवरा पशुखादय ग्रामद्योग केंद्र दिसत होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एम.एच. १७ ए.बी. ६३६३ व एम.एच. १७ बी.वाय. ६५८२ अश्या क्रमांकाची दोन

वाहने दिसत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासोबत दुसरा पंच वैभव अशोक गायकवाड हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, वरीलप्रमाणे पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व मी वाचून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. आर. मापारी यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा

दिनांक–१९/०६/२०२५.